**<u>नियमित दिवाणी दावा क्रं.१३०/१९९७ मधील निशाणी क्रं.२२६ वरील आदेश</u>**

**<u>( CNR No. :– MHKO070000541997 )</u>**

**(भास्कर कांबळे वि. मारुती कांबळे)**

१) प्रस्तुत अर्ज वादी यांनी दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केला असून असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामी दावा मिळकतीचे वर्णन नि.क्र.१ मध्ये दिलेले आहे, त्यामध्ये सि.स.नं. तसेच दावा मिळकतीची पूर्व पश्चिम लांबी रुंदी नमुद केली असून दावा मिळकत दाव्या सोबतच्या नकाशात लाल रंगाने दाखवली असून तो नकाशा दाव्याचा भाग आहे. अशास्थितीत कोणत्या मिळकतीबाबत वादी प्रतिवादी यांचे दरम्यान वाद चालू आहे याची प्रतिवदींनाही कल्पना आहे आणि प्रतिवादीनी कैफियतीमध्ये दाव्यासोबतचा नकाशा चुकीचा आहे म्हणून विधाने केली नाहीत. कायदयाच्य तरतूदीनुसार मिळकतीचे वर्णन असे असले पाहिजे की, उलट बाजूस कोणत्या मिळकतीबाबत दावा चालू आहे याची पुर्ण माहिती आहे. तथापी टायपिंग चुकीमुळे सि.स.नं. १५८६ हा नंबर चुकीने टाकला असून पॅरा क्र.२ व अन्य परिच्छेदामध्ये सि.स.नं.१५८० असेच वर्णन नाही तथापि टायपिंग चुकीने व नजरचुकीने सि.स.नं.१५८६ पडलेला आहे. त्याऐवजी सि.स.नं.१५८० अशी दुरुस्ती करणेस परवानगी मागीतलेली आहे. सदर दुरुस्तीने दाव्याचे वर्णन काटेकोर होणार असून वादी कोणतीही नवीन केस करत नाहीत. निव्वळ टायपिंग मुळे झालेली चुक दुरुस्त करुन मागत आहेत. अदयाप दावे कामी पुरावा चालू झालेला नाही. सदरची बाब प्रतिवदीच्या पुरात पडलेल्या बांधकामा संदर्भात युक्तीवाद करत असताना नजरेस आल्यामुळे ताबडतोब दुरुस्ती अर्ज दिलेला आहे. सदरचा अर्ज मंजूर केल्याने प्रतिवादीवर कोणताही अन्याय होत नाही सबब, सि.स.नं.१५८६ ऐवजी सि.स.नं.१५८० अशी दुरुस्ती करणेसाठी सदरचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती वादी करीत आहेत.

२) प्रतिवादी क्र.४ यांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे नि.२२८ कडे दिनांक २०-०१-२०२१ रोजी दाखल करुन वादीचे प्रस्तुत अर्जातील कथने ही नाकारलेली असून असे कथन केले आहे की, वादी यांनी सदरचा दावा १९९७ साली दाखल केलेला असून तेव्हापासून आजपावेतो वादीनी सदरची दुरुस्ती मागीतलेली नाही. त्यामुळे सदरची दुरुस्ती मगणेस इतका विलंब का झालेला आहे याचा खुलासा अर्जामये केलेला नाही. तसेच याकमी यातील वादी यांनी या पुर्वी दावा दुरुस्ती करुन मागीतली आहे व सदरची दुरुस्ती करणेस मे.न्यायालयाने परवानगी दिलेनंतर तशी दुरुस्ती करुन दावा दुरुस्तीची प्रत याकामी दाखल केलेली आहे त्यामध्येही सि.स.नं.१५८६ असे लिहिलेले आहे. सदरच्या दुरुस्तीने यातील वादी हे नवीन केस मांडत आहेत, त्यामुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये व दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये बदल होणार आहे. तसेच मा.न्यायालयाने प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास सदरचा दावा पुर्वपदावर येणार आहे. सबब, सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा. जर मा.न्यायालय सदरचा अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयाप्रत आलेस यातील प्रतिवादींना वादीकडून प्रत्येकी र.रु.१०,०००/- कॉस्ट देणेत यावी, असे कथन केलेले आहे.

३) वादी व प्रतिवादी तर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणातील कागदपत्राचे अवलोकन केले.

४) वास्तविक प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी प्रतिवादी विरुध्द हक्कज्ञापन व वाटणीसाठी दाखल करण्यात आलेला आहे. सबब, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये मुळ वाद संपुष्टात आणण्यासाठी तसेच प्रस्तुतचा दाव्याचे न्यायनिर्णयाकामी वादी हे प्रस्तुत अर्जान्वये दाव्यामध्ये करु इच्छीत असलेली दुरुस्ती ही आवश्यक आहे.

५) प्रस्तुत दाव्यात मुद्दे निश्चिती झालेली नाही. त्यामुळे वादीने मागितलेली दुरुस्ती ही मुळ दाव्याशी विसंगत नाही किंवा वादी हा नवीन केस घेवून न्यायालयासमोर येत आहे असे म्हणता येणार नाही. दुरुस्ती अर्जाचा विचार करताना दुरुस्तीचा दाव्याच्या अंतिम गुणावगुणावर काय परिणाम होईल याचा विचार करणे आवश्यक नाही हे संमत न्यायतत्व आहे. उभय पक्षकारांमधील मुळ वादप्रश्न प्रस्तुत दुरुस्तीमुळे गुणदोषावर मिटण्यास मदत होणार असुन

त्यामुळे मुळ वाद मर्यादीत राहून दाव्याचे स्वरुप मर्यादीत राहण्यास मदत होणार आहे. दुरुस्तीस मंजुरी दिल्यास दाव्यातील गुंतागुंत कमी होणार आहे. प्रस्तुत अर्ज नामंजूर केल्यास वादी व प्रतिवादीमधील दाव्यांची संख्या वाढून अनेकविध होण्याची शक्यता आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास कोणतीही नवीन केस अथवा दावा निर्माण होत नसुन दाव्याचे स्वरुप बदलत नाही. प्रस्तुतची चुक ही टायपिंग मधील चुकीमुळे झाली असलेचे दिसून येत आहे. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी सन १९९७ मध्ये दाखल केलेला आहे त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज हा नक्कीच विलंबाने दाखल केलेला आहे, प्रस्तुत दुरुस्ती अर्जास झालेल्या विलंबामुळे प्रतिवादींची जी गैरसोय झाली आहे ती नुकसानभरपाईच्या माध्यमातून भरुन येण्यासारखी आहे. सबब, सदरची बाब ही तांत्रीक स्वरुपाची असलेने अनेकविध दावे न होता गुणदोषावर दावा चालवून मूळ वादप्रश्न निर्णीत करण्याकरिता मी खालील आदेश पारित करतोः-

<u>आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.४ यांना र.रु.३००/- इतका खर्च म्हणुन देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो. मंजूर करण्यात येतो.

२. वादीने सदरची दुरुस्ती या आदेशाचे तारखेपासून १४ दिवसांचे आत करणेची आहे.

Digitally signed by Vishwas Pandurang Shinde
Date: 2021.02.11 16:43:07 +0530

ठिकाणः-जयसिंगपूर. **(** विश्वास पां.शिंदे **)**
दिनांकः-०४/०२/२०२१. २ रे सह दिवाणी न्यायाधीश, जयसिंगपूर.